**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| Punyanagari | Mumbai | 23/08/2017 | 01 | LIFFI |

# लोणावळयात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

**मुंबई** : १ ते ३ सप्टेंबरदरम्यान दुसऱ्या 'लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. त्रिओस प्लाझा, रायवूड्स, आयएनएस शिवाजी रोड, लोणावळा येथे होणाऱ्या या महोत्सवात 'कौटुंबिक मनोरंजन' आणि 'मनोरंजनातून शिक्षण' ही थीम असणार आहे. हिंदी आणि इंग्रजीमधील विविध प्रकारचे ३२ चित्रपट या महोत्सवात दाखविले जाणार आहेत.

या महोत्सवात सिनेमाच्या माध्यमातून कौटुंबिक व नैतिक मूल्ये लहान मुलांना शिकवली जाणार असल्याने लोणावळ्यातील सरकारी, खासगी शाळा, स्वयंसेवी संस्था व अनाथाश्रमातील मुलांना महोत्सवात मोफत चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. महोत्सवाची सुरुवात कौटुंबिक मनोरंजन करणाऱ्या 'हम साथ साथ है' चित्रपटाने होणार असून लहानग्यांसाठी 'हॅप्पी मदर्स डे' हा चित्रपट एकाच वेळी दोन स्वतंत्र स्क्रीनवर दाखविण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त 'हम आपके है कौन', 'आय एम कलाम', 'अंदाज अपना अपना', 'जलपरी', 'स्वर्ग', 'छोटा सिपाही', 'रसेल मॅडनेस', 'मंकी अप', 'द गोल', 'माय लकी एलिफंट' आदी चित्रपटही दाखवले जाणार आहेत. 'भीष्म पितामह' व 'शक्तिमान' या भूमिकांसाठी प्रसिद्ध असणारे व चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष असलेले अभिनेते मुकेश खन्ना या महोत्सवाचे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.